PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 2

# ग्रामीण साहित्यातील वैदर्भीय कथालेखन - एक सामाजिक आकलन

**प्राचार्य डॉ. ह. रा. जाधवर**
सरहद्द कॉलेज, कात्रज, पुणे
**महाराष्ट्र भारत**

आज मराठी विविध वाड:मय प्रकारातून लेखन होताना पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही साहित्यलेखन करून ठसा उमटविला आहे. डॉ. सौ. प्रतिमा इंगोले या अलिकडील काळातील नावारूपास आलेल्या कथालेखिका आहेत. व-हाडी ग्रामीण कथाकार त्यांचा विशेष नावलौकीक आहे. मराठी ग्रामीण साहित्य लेखनामध्ये त्यांनी मौलिक अशी भर टाकली आहे. वास्तव पातळीवरील जीवन अनुभव, व-हाडी बोलीचा वापर तसेच त्याला सामाजिक कार्य आणि कथाकथनामुळे लाभलेली प्रसिद्धीची जोड यामुळे त्यांनी आपल्या समकालीन कथालेखिकेपेक्षा एक पाऊल पुढे टाकले आहे. तसेच व-हाडी बोली भाषेतील लेखन, विदर्भातील ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव चित्रण अशा काही वैशिष्ट्यांमुळे त्यांचे कथालेखन वेगळ्या सामर्थ्यशीलतेने पुढे येते. त्यांच्या साहित्याकडे पहाण्याचा निकोप दृष्टिकोन आणि त्याला अभ्यास व चिंतनशीलतेची दिलेली जोड तसेच त्यांच्यातील सूक्ष्म संवेदनशीलता यामुळे त्यांच्या कथा वेगळेपणाचा स्वतंत्र ठसा उमटवितात. त्याविषयी प्रतिमा इंगोले म्हणतात, आतापर्यंत लेखिकांच्या लेखनातून आलेले स्त्रीचे जीवन हे हिमनगासारखे आहे. आजकाल खेड्यातूनही स्त्रिया शिकत आहेत पण त्यांच्या मनात एकतर न्यूनगंडाची भावना किंवा हे क्षेत्र किंवा लेखन हे उच्चभ्रू लोकांची मिरासदारी आहे असे तिला वाटत असते. शिवाय आत्मविश्वासाचा अभाव असतोच. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांकडे साहित्यनिर्मितीच्या दृष्टिने

अनुभवांचा कसदार, नावीन्यपूर्ण आणि भरपूर साठा असूनही त्या शब्दांकडे वळत नाहीत. त्या मौखिक मार्गाचा अवलंब करून आपला दुःखभार एकमेकींजवळ व्यक्त करतात. खेड्यातील प्रत्येक स्त्रीचे जीवन एकेका कादंबरीचा विषय ठरावा असेच आहे.

आधुनिक मराठी साहित्यविश्वाला समृद्ध आणि संपन्न करण्यामध्ये ज्याप्रमाणे अनेक लेखकांनी नव्याजुन्या साहित्यप्रकारातून, विशेषतः साठोत्तरी वाङ्‌मयातील ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्य या वाङ्‌मयीन प्रवाहांनी मराठी साहित्य क्षेत्राचे दालन व्यापक आणि तितकेच विस्तृत केले आहे. सर्व स्तरातील जीवनविश्वाला या साहित्य प्रवाहांनी तळागाळात जाऊन सर्वंकषतेने स्पर्श केला आहे. आजच्या मराठी वाङ्‌मयातील 'ग्रामीण साहित्य' हा एक प्रमुख वाङ्‌मयीन प्रवाह आहे. भारतातील आजही सुमारे 70% लोक ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातून रहाताना दिसतात. तेचे प्रतिनिधित्व ग्रामीण साहित्य करते. याला समृद्ध करण्याचे कार्य प्रतिमा इंगोले यांच्या वैदर्भिय कथेने केले आहे. आधुनिक मराठी वाङ्‌मयामध्ये प्रतिमा इंगोले यांचे कथालेखन दखलपात्र ठरले आहे. त्यांनी कथेखेरीज कादंबरी, कविता, ललितलेखन, वैचारिक लेखन, बाल साहित्य लेखन, संशोधन, संकलन, संपादन या क्षेत्रात भरीव असे लेखन केले असले तरी या ग्रामीण कथालेखिका म्हणूनच विशेष परिचित आहेत. यांनी आपल्या कथालेखनातून विदर्भातील व आसपासच्या परिसरातील, खेड्यापाड्यातील समाजजीवनाचे वास्तव दर्शन कलात्मकतेने आणि संवेदनशीलतेने घडविले आहे. त्यामुळे त्यांच्या कथांना परिणामकारकता लाभली आहे.

स्त्रीवादी भूमिका ठामपणे त्यांच्या कथांना लाभली आहे. विदर्भातील ग्रामीण भागातील सामान्य माणूस हा त्यांच्या कथालेखनाचा केंद्रवर्ती विषय असूनही त्यांच्या कथालेखनाला लाभलेली स्त्रीवादी बैठकही स्पष्टपणे दिसते. ग्रामीण जीवनविश्वाचे त्यांनी आपल्या कथालेखनातून भरलेले विविध रंग वैदर्भिय जीवनाचे, समाजाचे सहजसुंदर आकलन करून जातात.

विदर्भातील ग्रामीण साहित्याचा विचार करताना प्रतिमा इंगोले या त्यातील अग्रगण्य कथालेखिका आहेत. त्यामुळे त्यांचे मराठी साहित्यातील स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या साहित्यातून विदर्भातील ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण चित्रण वास्तवाभिमुख पातळीवर उमटले आहे. समाजव्यवस्था, लोकजीवन, लोकसंस्कृती, स्त्रियांचे स्थान आणि त्यांची कौटुंबिक व

सामाजिक भूमिका, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक स्थितीगती, चालिरीती, परंपरा, सण, उत्सव, सोहळे, लोकांचे स्वभाव विशेष, त्यांच्या जगण्या-वागण्याच्या पद्धती, परस्परसंबंध अशा अनेकविध गोष्टींचे चित्रण त्यांच्या कथालेखनातून आले आहे. त्यांच्या साहित्यलेखाची सुरुवात कथालेखनाने झाली आहे. त्यांची 'मियाबीबी राजी' ही पहिली कथा दै. तरूण भारत यातून प्रसिद्ध झाली. त्यांचे एकूण 7 कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या कथासंग्रहातील विविध कथांचा आशय आणि विषय त्यांच्या या विविध कथासंग्रहातील कथांनी मराठी ग्रामीण साहित्याला समृद्ध केले आहे. त्यांच्या वैदर्भिय कथांतून विविधांगी कथाविश्वाचे, समाजमनाचे, सामाजिक स्थितीगतीचे उत्कट आकलन होते.

प्रतिमा इंगोले यांचे कथालेखन प्रामुख्याने व-हाडी भाषेमध्ये असून त्यांची ओघवती, सहज, साधी, सरळ भाषाशैली मनामध्ये उतरणारी आहे. शिवाय कथा समजायला अत्यंत सुबोध आहेत. तसेच या कथा सामान्य ग्रामीण माणसांच्याच कथा असल्यामुळे भावणा-या आहेत. या कथा वाचकाला पुनःपुन्हा वाचायला आवडतील अशा असून त्यातील आशय आणि विषय माणसांच्या अंतर्मनाचे आकलन करणा-या आहेत. तसेच विचारप्रवृत्त करणा-या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथालेखनाने मराठी ग्रामीण कथेचे एक पाऊल पुढे पडले आहे.

त्यांच्या विविध कथांमधून सामाजिक स्थितीचे चित्रण आले आहे. सर्वच प्रवर्गातील ग्रामीण भागातील पुरुषांमध्ये असणारी वेगवेगळ्या प्रकारची व्यसने, परस्त्रीबरोबर संबंध ठेवण्याची प्रवृत्ती, स्त्रियांवर वर्चस्व ठेवण्याची वृत्ती तसेच शेतक-यांची दयनीय अवस्था, दारिद्‌य‘, प्रामाणिकपणा आणि त्यामुळे होणारी वाताहात, कष्ट करण्याची शेतक-यांची स्वाभाविक वृत्ती, गरीबी, दारिद्‌य‘, अर्धबेकारी, उपासमार, कर्जबाजारीपणा, राजकारण, भ्रष्टाचार, खोट्या प्रतिष्ठेसाठी चाललेली धडपड, परस्परांना मदत करण्याची, प्रेम करण्याची प्रवृत्ती, मुक्या जनावरावर त्यांचे असलेले प्रेम, शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी कारभार इत्यादी सामाजिक विषय त्यांनी आपल्या कथांमधून रंगविले आहेत.

त्यांच्या कथांमध्ये वेगवेगळे विषय आलेले दिसत असले तरी त्यांच्या कथांमधून निष्पन्न होणारा मतितार्थ एकाच विषयापर्यंत पोचत असल्याचे दिसते. त्यांची कोणतीही कथा वाचून पूर्ण झाली की त्याच कथेचे सारांश रूप दुस-या कथेमध्ये दिसून येते. प्रामुख्याने स्त्रीजीवनाचा आलेखच रेखाटलेला दिसून येतो. स्त्रियांवर होणारे अत्याचार पुरुषप्रधान

संस्कृतीमध्ये वैचारिक घुसमट होत असल्यामुळे होणारी स्त्रीची कुचंबणा, त्यांच्यातील श्रद्धा-अंधश्रद्धा, श्रीमंती-गरीबी यातील भेदभाव, हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा, उदरनिर्वाहासाठी कष्टमय आयुष्य, सासरची मंडळी, पतीची व्यसनाधीनता, बाहेरख्यालीपणा या गोष्टींचा त्यांच्या आयुष्यावर होणारा परिणाम यांचे यथार्थ चित्रण त्यांच्या कथांमधून आले आहे.

या कथांमधून प्रामुख्याने व-हाडी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. तेथील आणि कुटुंबव्यवस्था, समाज, तेथील संस्कृती, निसर्गसृष्टी यांचे स्वरूप या कथांमधून लक्षात येते. ग्रामीण जीवनाविषयीची विचारप्रणवता त्यांच्या कथेला आशयघन बनविते. ग्रामीण बोलीतल्या या कथा ग्रामीण मनांचे उत्कृष्ट आकलन करतात. म्हणून वाचकांच्या मनाचा ठाव घेतात.

त्यांच्या कथांमधून विदर्भातील खेड्यापाड्यातील सामान्य माणूस चित्रीत झालेला आहे. त्यांच्या कथा प्रामुख्याने स्त्रीवादी विचारसरणीच्या असल्याने, स्त्रियांचे प्रश्न आणि समस्यांचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये केंद्रीयत्वाने येते. ग्रामीण भागातील लोकजीवन आणि लोकसंस्कृती, व-हाडी बोली, व-हाडी आणि व-हाडीतील अनेकविध वैशिष्ट्यांना शब्दरूप देऊन आविष्कृत करणे हे कथासूत्र प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनामागे प्रामुख्याने आहे. त्यांच्या कथांचे कथानक म्हणजे प्रामुख्याने ग्रामीण भागातील कोणत्याही स्त्री-पुरुष, कुटुंब, समाज यांच्यामध्ये घडणारी कोणतीही एखादी घटना किंवा प्रसंग असतो. याच घटना-प्रसंगाच्या आधारे त्या कथाबीज फुलवित असतात. स्त्रियांच्या जीवनातीलच अनेक घटना-प्रसंगांना त्यांनी आपल्या कथांचे कथानक बनविले आहे. स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार कमी व्हावा, स्त्रियांकडे त्यांनी सकारात्मक दृष्टिने पहावे, शेतकरी वर्गाच्या दुरावस्थेला न्याय मिळावा, शिक्षण क्षेत्रातील दुराचार आणि अराजक कमी व्हावे अशा उदात्त हेतूने प्रेरित असलेल्या आशयाच्या कथा त्यांनी लिहिलेल्या आहेत.

प्रतिमा इंगोले यांच्या बराचशा कथा व्यक्तिगत अनुभवातून जन्माला आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथांतील कथानकही वास्तव समाजजीवनातील एखादी प्रत्यक्षात घडलेली घटना किंवा त्यासमोर घडलेला प्रसंग असतो. समाजातील गुण-दोष या कथानकातून व्यक्त करण्याचे कथासूत्र त्यांच्या कथांमधून प्राधान्याने दिसून येते. समाजातील हुंडा प्रथा, अंधश्रद्धा यांसारख्या गोष्टी कायमच्या नष्ट व्हाव्यात अशा आशयाच्या व-हाडी बोलीतील कथा वाचकांच्या मनाला भूरळ घालतात. तळागाळातल्या सामान्य

माणसांच्या वेदनेची कळ व लोकांच्या समजुती, लोकांच्या प्रथा, लोकांची जीवनाबद्दलची निश्चित केलेली किंवा परंपरेने चालत आलेली तत्त्वे प्रतिमा इंगोले आपल्या कथांमधून अधोरेखित करतात. प्रतिमा इंगोले यांच्या कथा ग्रामीण आणि स्त्रीवादी असल्याचे आपण पाहिलेच आहे. त्यांच्या कथांचे विषय कल्पना विलासात्मक नसून विदर्भातील ग्रामीण भागात घडणा-या घटना किंवा प्रसंग आहेत. समाजजीवनातील स्त्री-पुरुष त्यांचे परस्पर संबंध, नातीगोती, कुटुंबव्यवस्था, वृत्ती आणि स्वभावविशेष यांचेही त्यात चित्रण करतात. त्यांची कथा ग्रामीण व-हाडीचे लेणेल्यालेली भाषाही अत्यंत सौंदर्यपूर्ण अशी आहे. त्यांच्या भाषेला, त्यातील संवादांना एकप्रकारचे अनोखे लालित्य लाभलेले आहे. म्हणी, वाक्प्रचार, बोली भाषेची व्यवहारातील लकब या वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्तेमुळे त्यांच्या कथांना वायीन सौंदर्य लाभलेले आहे.

अलिकडील मराठी साहित्यामध्ये तळागाळातील समाजजीवनाच्या चित्रणाला प्राधान्य लाभलेले आहे. आजची मराठी कथा आशयाच्या समृद्ध आविष्कारासाठी मुक्तपणे अनुभवांची अस्सल अभिव्यक्ती करीत पुढे आली आहे. ही कथा मानवी जीवनाच्या आणि मानवी जीवन अनुषंगतेने येणा-या सर्वांगांना स्पर्श करते आहे. नेमका हाच अनुभव आपल्याला प्रतिमा इंगोले यांच्या कथांमधून प्रत्ययास येतो. सौ. प्रतिभा कुलकर्णी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतात, संत वाङ्‌मयात वर्णन केल्याप्रमाणे 'डोईचा पदर आला खांद्यावर' या वर्णनानुसार प्रतिमा इंगोले या खेड्यात राहूनही तिथल्या दुःखांना शहरी जीवनाचा त्याग न करता त्यातूच सुधारून लोकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी खेड्याला सोडलेले नाही. तिथल्या स्त्रियांच्याच नव्हे तर पुरुषांच्याही दुःखाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. सामाजिक दुःखाशी सतत समरस होण्याचा प्रयत्न त्यांच्या लेखनातून दिसून येतो. या वास्तववादी लेखनामुळे त्यांची कथा वाचकांच्या मनाला भावते.

प्रतिमा इंगोले याच्या कथांतील पात्रेही दररोजच्या स्वाभाविक जीवनविश्वात भेटणारी असल्यामुळे वाचकांना ती नवखी वाटत नाहीत. त्यांच्या कथांमधून चित्रीत झालेले समाजजीवन आणि लोकसंस्कृती यांचे चित्रण वास्तवदर्शी आणि अनुभवाच्या गाभा-यातून फुललेले असल्यामुळे ते वाचकाच्या मनाला एक सुखद अनुभव देते. त्यांच्या काही कथा घटना-प्रसंगाच्या माध्यमातून साकार होतात. त्यांच्या कथा ग्रामीण जीवनविश्वावर आधारित

असल्याने कथांमधील परिसरनिर्मिती, निसर्गसृष्टी आणि वातावरणनिर्मिती देखील ग्रामीण आशयाला अनुसरूनच येणारी आहे. त्यांच्या कथांमधील पात्रचित्रण प्रभावी आणि वाचकांच्या मनावर बिंबवणारे असल्याने कथेतील पंचफुला, गोकुयी, जिजाउ, श्रद्धाताई अशी अनेक पात्रे संस्मरणीय झाली आहेत. निवेदनपद्धतीतील गतिमानता, आटोपशीरपणा आणि सोपी, स्त्रीस्वाभाविकतेने आविष्कृत होणारी व-हाडी बोली त्यांच्या कथासौंदर्याचे भूषण ठरते. अशा विविधतेने नटलेल्या आणि वाङ्मयीन गुण-वैशिष्ट्यांनी भरलेल्या त्यांच्या कथा म्हणजे मराठी साहित्यातील अक्षरलेणी आहेत.

प्रतिमा इंगोले यांच्या साहित्याचे सामर्थ्य व मर्यादा लक्षात घेता असे जाणवते की लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे दर्शन अत्यंत संवेदनशीलतेने आणि व-हाडी ग्रामीण बोलीतून त्या घडवतात. हे त्यांच्या कथालेखनाचे मुख्य बलस्थान आहे. व-हाडातील सामान्य माणूस हा त्यांच्या कथालेखनातील चिंतनाचा मुख्य विषय असल्याने त्यांच्या कथा व-हाडी ग्रामीण कथा झाल्या आहेत. ग्रामीण जीवनाचा त्यांनी प्रत्यक्ष घेतलेला अनुभव, ग्रामीण समाजजीवनाशी त्यांच्या अनुभव विश्वाची अतूट असलेली नाळ आणि त्या सर्वकषतेचा आपल्या कथालेखनातून घडविलेला सहजसुंदर आविष्कार यामुळे त्यांची कथा वास्तवांची मूर्त शब्दरूप घेऊन आविष्कृत होते. या कथा एक ग्रामीण भागातील जनजीवनाचा चलचित्रपटच वाचकासमोर उभा करतात. भाषेची लयबद्धता, निवेदनपद्धतीतील रसाळता, मधुरता आणि सफाईदारपणा अशा गुणांमुळे प्रतिमा इंगोले यांच्या कथा वाचनीय झाल्या आहेत.

त्यांच्या कथा वाचल्यावर याच आशयाची कथा मागे कोठेतरी वाचल्यासारखी वाटत रहाते म्हणजे आशय विषयाची पुनरावृत्ती काही कथांमधून होते. तसेच विदर्भाव्यतिरिक्तच्या मराठी वाचकांना व-हाडी भाषेतील काही शब्दांचे अर्थ समजायला कधी कधी अवघड जात असल्याने आशयानुभवांच्या आस्वाद प्रक्रियेत अडथळा येतो. प्राध्यापक डॉ. भा. ल. भोळे म्हणतात, चटकदार प्रारंभ करून नंतर फ्लॅशबॅक पद्धतीने आधीची कथावस्तु वाचकासमोर मांडणे हा प्रकार लेखिकेने वापरला आहे. त्यातून मांडणीत तोचतोपणा येतो आणि दुसरे म्हणणे प्रारंभी व शेवटी त्याच्यात काल-प्रसंग विसंगती होण्याची विसंगती लेखिका करून बसते. अशा काही मर्यादा त्यांच्या कथालेखनात दिसत असल्या तरी त्यांच्या कथांचे सामर्थ्य मोठे आणि महत्त्वपूर्ण आहे.

प्रतिमा इंगोले यांच्या साहित्यात प्रामुख्याने स्त्रीजाणिवेशी व कुटुंब व्यवस्थेशी निगडीत असले तरी त्यांच्या कथालेखनाचा एकूणचा अवाका मर्यादीत आहे. कुटुंबातील स्त्री आणि तिचे इतरांशी असलेले नाते व त्यामधून निर्माण झालेला संघर्ष या भोवतीच या सर्व कथा फिरतात. कथालेखनाचा आशय व विषय अतिशय ढोबळ आहे शिवाय त्यामध्ये नाविन्य अजिबात नाही. पारंपारिक आई-मुलगी, सासू-सुन, पती-पत्नी यांच्या विशिष्ट कौटुंबिक नात्यातच कथा अडकून पडली आहे. त्या अर्थाने त्यांच्या कथांना ग्रामीण -कौटुंबिक कथा म्हणणेच योग्य ठरते. समाजातील बदलती जीवनमूल्ये, मूल्यव्यवस्था, स्त्रीमुक्त चळवळ, सामाजिक-राजकीय परिस्थितीचे पडसाद यापासून त्यांच्या कथा दूर आहेत. लेखिकेने दीन-दलित जीवनात त्यांच्या समाजात डोकावून कथेद्वारे त्यांना सहानुभूती दाखविलेली दिसत नाही. समाजातील उपेक्षित, दलित स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या कथा-व्यथा यांना शब्दबद्ध केलेले नाही असे जाणवते. मध्यमवर्गीय जाणिवेच्या कक्षातच त्यांनी कथा लिहून आपले अनुभवविश्च मर्यादित असल्याचे दाखवून दिले आहे. याशिवाय मनोविश्लेषण पद्धतीच्या कथालेखनाचा मागमूसही त्यांच्या ठिकाणी आढळत नाही. सूक्ष्म मनोविश्लेषण, पात्रापात्रांतील अंतर्गत संघर्ष, त्यांच्या मनातील, विचारातील गुंतागुंत, ताणतणाव यांचे अस्तित्व या कथासंग्रहात अपवादानेच दिसून येते. निवेदनात्मक, आत्मवाचक पद्धतीने कथालेखन करतात. त्यातही व्यक्ती रेखाटण्यात तोचतोपणा जाणवतो. त्यातले बारकावे समजून येत नाहीत. मात्र प्रतिमा इंगोले यांचे कथालेखन स्वतंत्र असून त्यांच्या कथालेखनावर कोणत्याही लेखकाचा वा सांप्रदायाचा प्रभाव राहिलेला नाही. असे असले तरी प्रादेशिक व-हाडी भाषेतील कथालेखनामुळे त्यांचा वाचकवर्गही एकूणच मर्यादित राहिला आहे. भाषाशैली-भाषिक रचना, भाषिक शब्द, भाषिक संवाद वर्हाडी असताना त्यामध्ये नैसर्गिकपणा व सहजता असूनही आकलनास वेळ लागतो हे मान्यच करावे लागते. शिवाय मुल्य म्हणजे कथांचे विषय ठराविक घटना-घडामोडी भोवतीच फिरतात. त्यामध्ये नावीन्य, वेगळेपणा जाणवत नाही. यातील ब-याचशा कथा बाळबोध वळणाच्या, बोधप्रधान, कथालेखनाचे नवे तंत्र व बदल लेखिकेने स्वीकारलेले दिसत नाहीत हे मान्यच करावे लागते. तरीही पूर्णपणे व-हाडी बोलीतील कथालेखन तसेच स्त्रियांचे अनेक प्रश्न आणि समस्यांना त्यांनी केलेला स्पर्श, ग्रामीण समाजजीवनाचे लोकसंस्कृतीचे केलेले सूक्ष्म आणि संवेदनशील चित्रण यामुळे त्यांच्या कथा आपल्या वेगळेपणाचा स्वतंत्र असा ठसा उमटवितात. त्यामुळे त्यांनी मराठी कथेचे दालन समृद्ध आणि संपन्न केले आहे.

प्रतिमा इंगोले या आजच्या मराठी साहित्यातील आघाडीच्या साहित्यकार ठरल्या आहेत. त्यांनी आपल्या कथा लेखनातून विदर्भाच्या ग्रामीण भागातील लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांचे वास्तव चित्रण केले आहे. प्रतिमा इंगोले यांनी कथा, कादंबरी, कविता, ललितलेखन, वैचारिक लेखन, बालसाहित्य लेखन याचबरोबर संकलन, संपादन, संशोधन या क्षेत्रातही मौलिक अशी कामगिरी केली आहे.

एकंदरीत प्रतिमा इंगोले यांच्या समग्र साहित्यातून मानवी मनाचे विविध पैलू सुख-दु:खे, वेदना, हुंकार यांचे आकलन होते. स्त्री जीवनाचे, स्त्रीविश्वाचे, स्त्रियांच्या विविध समस्यांचे, त्यांच्यावर होणा-या अन्याय अत्याचारांचे उत्कट दर्शन व आकलन त्यांच्या समग्र साहित्यातून होते. थोडक्यात त्यांनी ग्रामीण समाजजीवनाचे, लोकसंस्कृतीचे केलेले सूक्ष्म आणि संवेदनशील चित्रण म्हणजेच ग्रामीण साहित्यातील, कथालेखनातील अभिव्यक्त केलेले एक उत्कट सामाजिक आकलन आहे असे म्हणावे लागते.

## संदर्भ ग्रंथ -


1) गुंदेकर श्रीराम, 'ग्रामीण साहित्य - प्रेरणा आणि प्रयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, 1999
2) दातार छाया, 'स्त्री विमुक्ती', प्रकाशक विद्या खरे, संयुक्त स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद, पुणे, 1975.
3) नलगे चंद्रकुमार, 'ग्रामीण साहित्य अपेक्षा आणि उपेक्षा', अधिक प्रकाशन, पुणे, 1985
4) पाटील नरेंद्र भ., 'भाषा - लोकभाषा आणि परिभाषा', भोळे भा.ल. (संपा.), 'संशोधनाची क्षितीज', अमेय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 1985.
5) फडकुले निर्मलकुमार (डॉ.), 'स्वातंत्र्योत्तर काळातील वैचारिक काळातील वैचारिक निबंध 'प्रदक्षिणा', खंड 2 कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-30, 1998.
6) भोसले द.ता., 'ग्रामीण साहित्यः एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1989.
7) मर्ढेकर बा.सी., 'सौंदर्य आणि साहित्य', मौज प्रकाशन गृह, मुंबई, 1955
8) माडवकर भाऊ, 'वैदर्भीय कादंबरी विश्व', सेवा प्रकाशन, अमरावती, 1995.